# मानवी जीवनाच्या अर्थाच्या शोधात

**शशांक बा. माने**

सहयोगी प्राध्यापक तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती

**लेखासंदर्भात थोडक्यात:** टॉल्स्टॉय म्हटलं कि 'वॉर अँड पीस' व 'आना करेनीना' ही नावे प्रामुख्याने आपल्या डोळ्यासमोर येतात. खरंतर या दोन कादंबऱ्यांमुळेच टॉलस्टॉय लेखक म्हणून जगासमोर आले व जगानेही या दोन कादंबऱ्यांना अभिजात साहित्याचा दर्जा दिला. पण या दोन कादंबऱ्यांबरोबरच टॉल्स्टॉय यांनी अनेक कथा व लघुकादंबऱ्या लिहिल्या आहेत. प्रस्तुत लेखात यातील काही कथा व लघुकादंबऱ्यांतून टॉल्स्टॉय यांचे जीवनाबद्दलचे तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

जीवनाचा खरा अर्थ काय? मानवी जीवनाचे प्रयोजन काय? माणूस कशासाठी जगतो? खरा आनंद कशात आहे? असे प्रश्न अनेक विचारवंत व लेखकांना आज पर्यंत पडले आहेत, थोर रशियन लेखक टॉल्स्टॉयल (१८६२-१९१०) यांनाही ते पडले होते. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात टॉल्स्टॉयनी यावर सखोल चिंतन करून माणूस कशासाठी जगतो याचा शोध घेतला. कोणत्या प्रकारे आपण जगलो तर ते अर्थपूर्ण जगणे म्हणता येईल याचा त्यांनी साकल्याने विचार केला व आपल्या दीर्घ कथांतून त्यावर भाष्य केले. टॉल्स्टॉय सारख्या उमराव जमीनदाराला खरंतर आयुष्यात कशाचीच कमतरता न्हवती. मात्र भौतिक सुखांनी परिपूर्ण अशा आपल्या आयुष्यात ते आनंदी नव्हते. रशियातील सर्व उमराव आपल्यासारखेच जीवन जगत आहेत, या श्रीमंत-सुखवस्तू वर्गातील लोकांचं जगणं हे निरर्थक व पोकळ आहे याची जाणीव टॉल्स्टॉयना साधारण १८७० नंतर होऊ लागली. तारुण्यात अतिशय उतशृंखलपणे जगलेल्या लियोने नंतर मात्र एक सन्यस्थ जीवन अंगिकारले, ते पूर्णपणे निर्व्यसनी बनले व एका शेतमजुरासारखे साधे व कष्टाचे जीवन जगू लागले. त्यांच्या वाचनात आलेल्या कोणत्याही तत्ववेत्याचे अथवा लेखकाचे तत्वज्ञान वा विचार त्यांचे मानवी जीवनाबद्दलच्या प्रश्नांचे समाधान करू शकले नाहीत. मात्र मानवी जीवनाचा अर्थ काय या प्रश्नाचे उत्तर त्यांना रशियातील शेतमजूर व कष्टकरी लोकांकडे पाहून मिळाले.

'फॅमिली हॅप्पीनेस' हि कथा टॉल्स्टॉयनी १८५९ साली लिहिली. या कथेतून टॉल्स्टॉय रशियातील सरंजामशाहीवर टीका करतात. वर्षानुवर्षे ऐष आरामात राहणाऱ्या उच्चभ्रू वर्गाला गरिबांबद्दल जराही दया, प्रेम नाही याची जाणीव सर्गेई मिखाईलीच या जमीनदाराला होते.